भारती विदयापीठ पोलीस स्टेशन
पुणे

भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक –३१/१०/२०१८

- प्रेसनोट –

पत्र्याचे शेड कापुन गोडावुन मधील नळाची चोरी करणारे आरोपींना अटक.

---

दिंनाक.३०/१०/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस सहा.पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व महेश मंडलीक यांना त्याच्या गुप्त बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, आंबेगाव येथील रंगोली बाथ डिस्ट्रीब्युटर्स गोडावुन मधुन नळ चोरी करणारा आरोपी हा नऱ्हे आंबेगाव येथील ब्रीजच्या जवळ त्याच्या मित्राला भेटण्यासाठी येणार आहे. त्याने अंगात पाढरे रंगाचा शर्ट व ग्रे रंगाची पॅन्ट घातलेली आहे. वरिल मिळालेल्या बातमीप्रमाणे व घटनास्थळापासुन खडकवासला रोड दरम्यान असणाऱ्या सीसीटिव्हि फुटेजच्या आधारे तपास करुन व बातमीप्रमाणे तपास पथकातील स्टाफच्या मदतीने नऱ्हे ब्रीजकडुन आंबेगाव गायमुखच्या दिशेने वेगवेगळे गट करुन सापळा रचुन थांबलो असता एक इसम मिळालेल्या बातमीप्रमाणे नऱ्हे ब्रीजकडुन आंबेगाव गायमुखच्या दिशेने. जाताना दिसला त्यास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव १. अर्जुन भिमा सांळवे, वय ३२ वर्षे, रा. धायरीगाव, धायरीश्वर मंदिर, लेन नं.०३, घर क्रंमाक ८३ धायरी पुणे असे सांगितले. त्याच्याकडे चोरी गेलेल्या नळाच्या बाबत विचारपुस करता त्याने त्याचे साथीदार संतोष निवगुणे रा. शिवणे व गणेश शिंदे रा. शिवणे यांच्यासह आंबेगाव येथील गोडावुन मधुन दि.२१/१०/२०१८ रोजी मध्यरात्री गोडावुनचे पत्र्याचे शेड तोडुन गोडावुन मधील पेरिवेअर कंपनीचे नळ टेपो क्रं.एम.एच.१२ जे.एफ.१०६५ मध्ये टाकुन चोरी केले व सदर चोरी केलेला मुददेमाल हा छोटु यादव या मित्राच्या सिंहगड रोड नांदेड फाटा येथील छोटु स्क्रॅप सेंटर दुकानात विकणे करिता लपवुन ठेवले असल्याचे सांगितले. तेव्हा छोटु स्क्रॅप सेंटर येथुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गु.र.न.५६६/२०१८ भा.द.वि.कलम. ४५४,४५७,३८० मधील एकुण ३,१०,५००/- रु कि. नळ असलेले १२ ब्रॉक्स जप्त केले आहे. गुन्हयातील आरोपी अर्जुन भिमा सांळवे, वय ३२ वर्षे व छोटु रामफेर यादव, वय १९ वर्षे, रा. नांदेडगाव, ता.हवेली जि.पुणे यास भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गु.र.न.५६६/२०१८ भा.द.वि.कलम. ४५४,४५७,३८० प्रमाणे दाखल असणाऱ्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी अर्जुन भिमा सांळवे यांच्यावर यापुर्वी घरफोडीचे ६ गुन्हे दाखल आहेत. अटक आरोपी यांच्याकडे अधिक तपास करणेकामी व पाहिजे आरोपी संतोष निवगुणे व गणेश शिंदे यांचा शोध घेणेकामी मा. न्यायालयाकडुन पोलीस कस्टडी रिंमाड घेऊन अधिक तपास करण्यात येत आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री रविंद्र रसाळ यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेटटी, पोलीस कर्मचारी गणेश चिचंकर, महेश मंडलीक, सर्फराज देशमुख, अभिजीत रत्नपारखी, कुंदन शिदे, चंद्रकांत फडतरे, कृष्णा बढे, सचिन पवार, राहुल तांबे यांनी केलेली आहे.